नियमित दिवाणी दावा क्र. १६०/१९७९

## निशाणी १४६ खालील आदेश

१. वादीने सदरचा अर्ज मुदतीचा कायदा कलम ५ अन्वये विलंब माफीसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ५ हे मयत झाल्याने प्रतिवादी क्र. ५अ यांना त्यांचे वारस म्हणून सामील करुन घेतले होते. त्यानंतर प्रतिवादी क्र. ५अ यांनी हजर होऊन कैफियतमध्ये प्रतिवादी क्र. ५ यांना पत्नी दमयंती व मुलगी प्रतिभा वारस असल्याचे उल्लेख केलेला आहे. परंतू त्यांची पूर्ण नावे व पत्ते दिलेले नाही. वादी यांनी केलेल्या अर्जावरुन व न्यायालयाने केलेल्या आदेशावरुन दि. १६.०१.२०२३ रोजी प्रतिवादी क्र. ५अ यांनी प्रतिवादी क्र. ५ चे वारस दमयंती व प्रतिभा यांचे संपूर्ण नाव व पत्ते दिलेले आहेत. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ५ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता उशीर झालेला आहे. सदरचा दावा हा स्थावर मालमत्ता संदर्भात असल्याने प्रतिवादी क्र. ५ चे उर्वरित वारस अभिलेखावर घेण्यास झालेला उशीर माफ होऊन मिळणे गरजेचे आहे. करिता अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. या उलट प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ५ यांचे वारसांचे संपूर्ण नावे व पत्ते या आगोदर दिलेले आहे. त्यामुळे त्यांचे नावे व पत्ते पुन्हा देण्याची गरज नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभिलेखावर दाखल मृत्यु दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ५ हे दि. १९.१२.२०१८ रोजी मयत झाले आहे. त्यांचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र. ५अ हे या पूर्वीच अभिलेखावर घेतलेले दिसून येतात. परंतू मयत प्रतिवादी ५ ची पत्नी दमयंती व मुलगी प्रतिभा या अभिलेखावर घेण्याची वादीकडून राहून गेले होते. वादी यांनी प्रतिवादी क्र. ५ चे वारस अभिलेखावर घेण्यास उशीर का झाला याबाबत कोणतेही कारण नमूद केले नाही. परंतू मुदतीचा कायद्याच्या आर्टीकल १२० प्रमाणे व्यक्ती मयत झाल्यापासून ९० दिवसांच्या आत त्याचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. वादीस प्रतिवादी क्र. ५ चे वारस अभिलेखावर घेण्यास ९० दिवस उलटून गेल्याचे दिसते. परंतु दावा स्थावर मिळकतीचा असल्यामुळे व गुणदोषांवर निकाली काढण्याकरिता मयत प्रतिवादी क्र. ५ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब माफ करणे योग्य व न्यायोचित आहे. करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२ वादीकडून झालेला उशीर या अटीवर माफ करण्यात येतो की, वादी यांनी प्रतिवादी क्र. ५ च्या वारसांना रुपये ३००/– कॉस्ट द्यावे.

(ए टी गित्ते)

दि. ३०.०१.२०२३. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, माढा.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | A.K.B. Shaikh Grade 3 |
| Court | - | Court of Civil Judge, Jr. Div. & J.M.F.C., Madha. |
| Date of order/judgment signed by presiding officer. | - | 30.01.2023. |
| Judgment/Order uploaded on | - | 31.01.2023. |